कासेगांव शिक्षण संस्थेचे,

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,

राजारामनगर, ता.वाळवा, जि.सांगली.

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रम व विशेष सेवा शिबीर

# अहवाल

## सन २०१६–१७

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
# राष्ट्रीय सेवा योजना
# नियमित कार्यक्रम व विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल





## वर्ष – २०१६–१७

१. महाविद्यालयाचे नांव :– राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,राजारामनगर,साखराळे ता.वाळवा,जि.सांगली फोन क्र. ०२३४२–२२०३२९
ई.मेल – director@ritindia.edu

२. संलग्न विद्यापीठाचे नांव :– शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३. प्राचार्यांचे/संचालकांचे नांव :– डॉ.सौ.एस्.एस्.कुलकर्णी

४. कार्यक्रम अधिकाऱ्याचे नांव व पत्ता :– १) श्री. संदीप शामराव पाटील
सिध्द्नाथ मंदीर शेजारी, पाटील गल्ली, उरुण–इस्लामपूर, ता. वाळवा जि. सांगली फोन नं–९९७०७००७५७
ई.मेल – sandip.patil@ritindia.edu

५. कार्यक्रम अधिकाऱ्याचे नांव राष्ट्रीय सेवा योजना ओरीएन्टेशन कोर्स

---

६. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना सुरू झाल्याचे वर्ष :– सन २००९ – २०१०

७. २०१६–१७ या वर्षाच्या नियमित कार्यक्रमाचा तपशील

७.१ नियमित कार्यक्रमासाठी विद्यापीठाकडून मंजूर विद्यार्थ्यांची संख्या :– १००
७.२ महाविद्यालयाने प्रत्यक्ष नोंदविलेली विद्यार्थी संख्या :– १००
७.३ २०१६–१७ या वर्षात २४० तास पूर्ण करणारे विद्यार्थी मुले ८५ मुली १५
७.४ दत्तक घेतलेले गाव :– साखराळे, ता.वाळवा, शिबीर कालावधी :– ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी २०१७
७.५ नियमित कार्यक्रमात व श्रमसंस्कार शिबीरामध्ये राबविलेले प्रकल्प व कार्यक्रमाचा तपशील

## १ श्रमदानातून राबविलेले प्रकल्प

अ. वृक्षारोपन –उद्यान विकास

| कामाचे स्वरुप | संख्या लागलेले दिवस/तास | झालेल्या कामाची अंदाजे किंमत रु. | फायदा कोणाचा झाला |
|---|---|---|---|
| खड्डे काढणे | २०० खड्डे, २ दिवस | ९०००/– | महाविद्यालय परिसर |
| खड्डयात माती भरणे | | | |
| खड्डयात रोपटी लावणे | २०० रोप ४ तास | ४०००/– | महाविद्यालय परिसर |
| झाडांना पाणी घालणे | ५० झाडे, चार तास | ५०००/– | शाळेतील विद्यार्थ्यांचा |

ब. पाणी पुरवठा

| कामाचे स्वरुप | क्षेत्रफळ ला X रु X खो | लागलेले दिवस/तास | झालेल्या कामाची अंदाजे किंमत रु. | फायदा कोणाचा झाला |
|---|---|---|---|---|
| विहीर स्वच्छता | निरंक | निरंक | निरंक | |
| पाईप लाईन व चरी खुदाई | निरंक | निरंक | निरंक | |
| तलाव सुशोभिकरण आराखडा | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

क. परिसर स्वच्छता

| कामाचे स्वरुप | क्षेत्रफळ ला X रु X खो | लागलेले दिवस/तास | झालेल्या कामाची अंदाजे किंमत रु. | फायदा कोणाचा झाला |
|---|---|---|---|---|
| गटार सफाई | ५००० चौ.फु. | ६ तास | १५०००/– | साखराळे ग्रामस्थ |
| गटार खुदाई | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ग्राम सफाई | ५ एकर | ५ पूर्ण दिवस | १००००/– | साखराळे ग्रामस्थ |
| उपद्रवी गवत व वृक्ष काढणे | २ एकर | ४ तास | ४०००/– | साखराळे ग्रामस्थ |

ड. पाया खुदाई

| कामाचे स्वरुप | क्षेत्रफळ ला X रु X खो | लागलेले दिवस/तास | झालेल्या कामाची अंदाजे किंमत रु. | फायदा कोणाचा झाला |
|---|---|---|---|---|
| निरंक | | निरंक | निरंक | |
| निरंक | | निरंक | निरंक | |
| निरंक | | निरंक | निरंक | |

## २. क्रिडांगण दुरुस्ती

| कामाचे स्वरुप | क्षेत्रफळ ला X रु X खो | लागलेले दिवस/तास | झालेल्या कामाची अंदाजे किंमत रु. | फायदा कोणाचा झाला |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक शाळा क्रिडांगण सपाटीकरण व स्वच्छता | | ८ तास | ७०००/– | म्हाविद्यालय व साखराळे येथिल विद्यार्थी |

ई. रस्ते दुरुस्ती

| कामाचे स्वरुप | क्षेत्रफळ ला X रु X खो | लागलेले दिवस/तास | झालेल्या कामाची अंदाजे किंमत रु. | फायदा कोणाचा झाला |
|---|---|---|---|---|
| रस्त्यावरचे खड्डे बुजविणे व भर टाकणे | ७०० चौ.फु. | ४ तास | २०००/— | साखराळे |

३. करमणुकीतून प्रबोधन कार्यक्रम

| अ.क्र. | प्रकार | विषय | आयोजन दिनांक | ठिकाण | लाभार्थींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | एकांकिका | दो बजनिए | ११ एप्रिल २०१७ | इस्लामपूर | ७०० |
| २ | लघुनाटिका | 'डिजीटल अर्थव्यवस्था जनजागृती ' | ०६/०१/२०१७ व ०६/०१/२०१७ | साखराळे ग्रामपंचायत समोर | अंदाजे ३०० ते ३५० |
| ३ | मुकनाट्य | बाल मजूर | २६ जाने. २०१७ | महाविद्यालय येथे | अंदाजे ७०० ते ८०० |
| ४ | पथनाट्य | 'स्वच्छता अभियान, हुंडा बळी व व्यसन मुक्ती' | २६ जाने. २०१७ | महाविद्यालय येथे | अंदाजे ७०० ते ८०० |
| ५ | सोंगी भजन | निरंक | | | निरंक |
| ६ | लोकनाट्य | निरंक | | | निरंक |

४. राष्ट्रीय सेवा योजना प्रचार व प्रसार कार्यक्रम

| अ.क्र. | प्रचार व प्रसार प्रकार | दिनांक | स्थळ | सहभागी व्यक्ती | लाभार्थींची संख्या | आयोजनाचा हेतू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभातफेरी, वृक्ष दिंडी | ३१ जुलै २०१६ | बलवडी | स्वयंसेवक व ग्रामस्थ | संपूर्ण गांव | हरित महाराष्ट्र |
| २ | राष्ट्रीय एकात्मता दौड | ३१ ऑक्टोबर २०१६ | इस्लामपूर | स्वयंसेवक | समाज | |
| ३ | पारंपरिक वेशभूषा कार्यक्रम | २७ फेब्रुवारी २०१७ | आर.आय.टी. | विद्यार्थी | १००० | संस्कृती |
| ४ | रोझ डे | निरंक | | | | निरंक |
| ५ | शोभा यात्रा | निरंक | | | | निरंक |

५. प्रबोधनातून राबविलेले कार्यक्रम

| अ.क्र. | विषय | आयोजन दिनांक | प्रमुख वक्ते | ठिकाण | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | योग आणि आरोग्य | ०२/०१/२०१७ | मा.शशिकांत माने | ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे | १०० |
| २ | डिजीटल अर्थव्यवस्था | ०३/०१/२०१७ | मा.धनंजय चव्हाण | ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे | २५० |
| ३ | ताण—तणाव आणि व्यसनाधिनता | ०४/०१/२०१७ | मा.कालिदास पाटील | ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे | १५० |
| ४ | प्राणि मित्र | ०५/०१/२०१७ | मा.शंकर कुलकर्णी<br>मा.निवास कळसे | ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे | २५० |
| ५ | अंधश्रध्दा आणि बुवाबाजी | ०६/०१/२०१७ | प्रा.विष्णू होनमोरे | ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे | २५० |
| ६ | विवेकी जीवन पध्दती | ०७/०१/२०१७ | प्रा.संजय बनसोडे | ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे | २०० |

६. चर्चासत्रे/परिसंवाद/वादविवाद/बैठका

| अ.क्र. | विषय | आयोजन दिनांक | सहभागी व्यक्ती | ठिकाण | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यक्रमाची आखणी बैठक | २७ डिसेंबर १६ | डॉ.एस.एम.सावंत सरपंच,जि.प. सदस्य,उपसरपंच ग्रा.पं. सदस्य इ. | आर.आय.टी. राजारामनगर | |
| २ | कार्यक्रमाचा आढावा बैठक | ०८ जानेवारी १७ | पंचायत समिती सभापती, सरपंच,उपसरपंच ग्रा.पं. सदस्य ग्रामस्थ इ. | ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे | १५० |
| ३ | क्षार पडिक जमीन विकास | | | | निरंक |
| ४ | वृक्ष व पर्यावरण संतुलन | ३१ जुलै २०१६ | भाई संपतराव पवार | बलवडी | ११० |
| ५ | स्त्री मुक्ती व आरक्षण | | | | निरंक |
| ६ | अधुनिक शेती | | | | निरंक |

७. राष्ट्रीय सेवा योजना जनसंपर्क मोहिम

| अ.क्र. | मिटींग/ बैठका | दिनांक | उपस्थितांची संख्या | ठिकाण | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | एन्.एस्.एस्. सल्लागार समिती | | | | |
| २ | एन्.एस्.एस्.कार्यक्रम अंमलबजावणी मिटींग स्वयंसेवकांबरोबर | २८/०७/२०१६ | १०० | आर.आय.टी. राजारामनगर | |
| ३ | ग्राम सभा | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | निसर्ग सहल | २५ व २६ फेब्रुवारी २०१७ | १०० | सागरेश्वर अभयारण्य | विद्यार्थी |
| ५ | ग्रामस्थ भेटी | ३० डिसेंबर २०१६ | ५० | साखराळे | ग्रामस्थ |

## ८. महिला विषयक कार्यक्रम

| अ.क्र. | मिटींग/ बैठका | दिनांक | उपस्थितांची संख्या | ठिकाण | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | महिला मेळावा | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २ | बालक मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम व सदृढ बालक स्पर्धा | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३ | हळदी कुंकु समारंभ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | उखाणे स्पर्धा | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ५ | 'व्यसनमुक्ती' प्रबोधन फेरी व पथनाटय | ०८/०१/२०१७ | ४५० | साखराळे गावामध्ये विविध ठिकाणी | ग्रामस्थ |
| ६ | हुंडा बंदी घोषणा सहफेरी | ०२ जानेवारी २०१७ | ६० | साखराळे | ग्रामस्थ |
| ७ | जागतिक महिला दिन व्याख्यान | ०८ मार्च २०१७ | ३०० | आर.आय.टी | महिला |

## ९. आरोग्य विषयक प्रकल्प

१. १ ऑक्टोबर २०१६ रोजी 'जागतिक रक्तदान' दिनानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले यामध्ये ९० विद्यार्थी, विद्यार्थिनींनी रक्तदान केले.

२. दि. २ ऑक्टोबर २०१६ मा.पंतप्रधान यांनी सुचित केल्याप्रमाणे 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत इस्लामपूर परिसरामध्ये श्रमदान करण्यात आली यावेळी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

३. एड्स प्रकल्प :— १ डिसेंबर २०१६ रोजी इस्लामपूर येथे आयोजित केलेल्या एड्स जनजागृती मोहिमेअंतर्गत फेरीमध्ये सहभागी

४. आरोग्य तपासणी :— महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासणी शिबीर आयोजन

५. पल्स पोलिओ लसीकरण :— निरंक

६. मुलींच्या शिक्षणासाठीचे प्रयत्न :— साखराळे येथिल मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण आयोजित केले.

## १०. साखर शाळा :— निरंक

११. महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या वतीने साजरे करण्यात आलेले दिन सप्ताह कार्यक्रम खालीलप्रमाणे.

१. २१ जुन २०१६ रोजी जागतिक योग दिन महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी योग विद्या धाम, नाशिक, शाखा– इस्लामपूर यांचे वतीने श्री. शशिकांत माने यांनी योग प्रात्यक्षिक व प्राणायम याचा सराव घेतला. यावेळी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले.
२. दि. १ जुलै २०१६ महाराष्ट्र शासनाने ''हरित महाराष्ट्राची'' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन व जनतेच्या सहभागातून सन २०१६ या वर्षातील पावसाळयात ''वन मोहत्सव'' कालावधीत दि. १ जुलै २०१६ या एकाच दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. या अनुशंगाने येथिल राजारामबापू इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर महाविद्यालयामध्ये या दिवशी २०० वृक्ष लागवड करण्यात आली.
३. २६ जुलै २०१६ रोजी सन २०१६–१७ या वर्षासाठी स्वयंसेवक नोंदणी कार्यक्रम व नवीन युनिटचे उद्‌घाटन समारंभ आयोजित केला. या वेळी वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द चे डॉ. सुरज चौगुले यांचे हस्ते उद्‌घाटन झाले व त्यांनी विद्यार्थ्यांना **''राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी''** या विषयावर मार्गदर्शन केले.
४. दि. ३१ जुलै २०१६ राष्ट्रीय सेवा योजना व विवेक वाहिनीच्या वतीने बलवडी भा. ता. खानापूर येथील क्रांती स्मृतिवनामध्ये एकदिवसीय कार्यशाळा व श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. बलवडी गावामधून वृक्षदिंडी काढण्यात आली. या नंतर राज्य शासनाचा कृषी मित्र पुरस्कार प्राप्त झालेले भाई संपतराव पवार, ज्यांच्या प्रयत्नातून व कष्टातून बलवडी येथे क्रांती स्मृतिवन उभारले आहे, ज्यामध्ये क्रांतीकारकांच्या नावाने वृक्षरूपी स्मारक उभारलेले आहे. त्याची संकल्पना व त्याचे महत्व याची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. यानंतर एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी सकाळच्या सत्रात स्मृतिवनामध्ये स्वच्छता व श्रमदान केले. दुपारच्या सत्रामध्ये सापांच्या जाती, आपल्या भागामध्ये आढळणारे साप व साप चावल्यास प्रथमोपचार काय करावे याविषयी माहिती दिली तसेच अंधश्रध्दा व बुवाबाजी याविषयी चर्चा, मार्गदर्शन तसेच सायंकाळच्या सत्रामध्ये बलवडीतील बळिराजा धरण, क्रांती स्मृतिवन निर्मिती व जनचळवळीत योगदान दिलेल्या थोर व्यक्तींच्या नावाने स्मृतिवनाच्या प्रवेशद्‌वाराजवळ विद्यार्थ्यांच्या कडून वृक्षारोपण करण्यात आले.
५. **दिनांक १ ऑगस्ट** लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे व महाविद्यालयाचे संस्थापक लोकनेते राजारामबापू पाटील यांची जयंती या निमित्ताने महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन केलेले होते. यामध्ये एकूण २३२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.
६. **स्वातंत्र्य दिन :–** १५ ऑगस्ट २०१६ हा भारतीय स्वातंत्र्य दिन महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी मा.प्राचार्या यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालय परिसरामध्ये पथनाटय व मुकनाटय सादर करण्यात आले. तसेच महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.
७. दि.२८ ऑगस्ट २०१६ अंधश्रध्दा व जादुटोणा या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. यामध्ये प्रशांत पोतदार यांनी विद्यार्थ्यांना जादुचे प्रयोग कसे केले जातात. व त्यातुन लोकांची फसवणूक कशी केली जाते याचे प्रात्यक्षिक दाखविले व सहभागी विद्यार्थ्यांना जादूचे प्रयोग शिकविले.

८. **शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम :—** ५ सप्टेंबर २०१६ रोजी साखराळे जिल्हा परिषद शाळा क्र. २ मध्ये शिक्षक दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संगणक विषयी मार्गदर्शन केले.

९. **२४ सप्टेंबर २०१६ राष्ट्रीय सेवा योजना** दिनाचे औचित्य साधुन या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरामध्ये स्वच्छता व श्रमदान केले. तसेच या दिवशी महाविद्यालयाच्या वसतीगृह आवारामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. या मध्ये १०० स्वयंसेवक सहभागी झाले

१०. **१ ऑक्टोबर २०१६ जागतिक रक्तदान दिन —** या निमित्त महाविद्यालय परिसरामध्ये राजारामबापू रक्तपेढी, इस्लामपूर व राष्ट्रीय सेवा योजना यांचे वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. यामध्ये १०५ रक्तदात्यांनी (विद्यार्थी विद्यार्थिंनी यांनी) रक्तदान केले.

७. **२ ऑक्टोबर २०१६ रोजी** म.गांधी व लालबहादुर शास्त्री यांची जयंती साजरी मा.पंतप्रधान यांनी सुचित केल्याप्रमाणे 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत उरूण—इस्लामपूर नगरपरिषद यांचे वतीने इस्लामपूर येथे श्रमदान करण्यात आले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

८. **दि. २० ऑक्टोबर २०१६** रोजी जेष्ठ साहित्यिक मा.श्रीपाल सबनीस यांचे ''वास्तव आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य'' या विषयावर व्याख्यान आणि चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

९. **२६ नोहेंबर २०१६** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंतीनिमित्त आपल्या महाविद्यालयामध्ये शनिवार दिनांक २६ नोहेंबर २०१६ हा दिवस **''संविधान दिन''** म्हणून साजरा केला. या निमित्ताने भारताच्या संविधान सरनाम्याचे वाचन महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यांनी **शनिवार दिनांक २६ नोहेंबर २०१६ रोजी सकाळी १०.१५ वाजता मुख्य इमारतीच्या पोर्च** मध्ये केले.

१०. **१ डिसेंबर २०१६ जागतिक एडस जनजागृती दिन** –
आस्था आरोग्य केंद्र, इस्लामपूर व ग्रामीण रूग्णालय, इस्लामपूर यांचे वतीने शहरातून विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले. या फेरीमध्ये महाविद्यालयातील रा.से.योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

११. **१२ जानेवारी २०१७** स्वामी विवेकानंद यांची जयंती 'राष्ट्रीय युवा दिन' साजरी करण्यात आली.

१२. **प्रजासत्ताक दिन :—** २६ जानेवारी २०१७ या भारतीय प्रजासत्ताक दिनी महाविद्यालयामध्ये ध्वजारोहण करण्यात आले. प्राचार्या डॉ.सौ.एस्.एस्.कुलकर्णी यांचे हस्ते ध्वजस्तंभाचे पुजन व ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी व एन्. एस्.एस्. चे स्वयंसेवक उपस्थित होते. यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाटय व मुकनाटय सादर करण्यात आले.

१३. दि.०८ फेब्रुवारी २०१७ मा.दत्ता बाळसराफ, मुंबई यांचे ''आरक्षण'' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

१४. **शिवजयंती :—** महाविद्यालयामध्ये १९ फेब्रुवारी २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पन्हाळागड येथून शिवज्योत आणली गेली. महाविद्यालयामध्ये शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व स्वयंसेवक उपस्थित होते.

१५. आकाश दर्शन आणि पदभ्रमंती :– रा.से.यो. व विवेक वाहिनी यांचे वतीने दि. २५ व २६ फेब्रुवारी २०१७ रोजी सागरेश्वर जि.सांगली येथे दोन दिवशीय कार्यशाळेचे आयोजन केले गेले. यामध्ये सागरेश्वर अभयारण्य याविषयी माहिती, जादुटोणा याविषयी अंधश्रध्दा, सागरेश्वर येथे १७ कि.मी. पदभ्रमंती असा कार्यक्रम आयोजित केलेला होता. याकरिता अंकुश चव्हाण, भास्कर सदाकाळे, डॉ.नितीन शिंदे, श्री.शंकर शेलार यांनी मार्गदर्शन केले.

१६. **दि. ०८ मार्च २०१७ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त** महाविद्यालयातील विद्यार्थिनी व महिला यांचे करिता डॉ.दिपा देशपांडे यांचे व्याख्यान आयोजित केले या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील रा.से.योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

१७. **दि. १५ मार्च २०१७** रोजी महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ७६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

१८. **दि. ०४ एप्रिल २०१७** रोजी राष्ट्रीय सेवा योजनाचे वतीने महाविद्यालयामध्ये प्रसिध्द सिनेअभिनेते मा.गिरीश कुलकर्णी व दिग्दर्शक अतुल पेठे यांचे बरोबर चर्चासत्र आयोजित केले. या वेळी महाविद्यालयातील २०० विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी मा.गिरीश कुलकर्णी व दिग्दर्शक अतुल पेठे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१९. दि. १४ एप्रिल २०१७ भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२६ वी जयंती महाविद्यालयामध्ये साजरी करण्यात आली. या निमित्त प्रा.प्रमोद गंगणमाले–दुर्गा यांचे व्याख्यान आयोजित केले. यावेळी डॉ.एस.एम.सावंत, डीन, स्टुडंट डेव्हलपमेंट व विद्यार्थी उपस्थित होते.

२०. दारुबंदी सप्ताह :– साखराळे येथे विविध ठिकाणी दारूबंदीवर लघुनाटिका सादरीकरण

१. कुष्ठरोगी शोधमोहिम सर्वेक्षण व उपचार

२. बालक तपासणी

३. पशुधन चिकित्सा व मोफत औषध उपचार

१४. कृषी विषयक आयोजित कार्यक्रम :– निरंक

२१. १५. शिक्षण विषयक कार्य :– निरंक

२२. शिक्षण सुधार योजना:– निरंक

२३. शाळा गळती कार्य :– निरंक

१५. **महाविद्यालयात खालील स्पर्धा/विशेष नाविण्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आले.**

१. दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ रोजी महाविद्यालयामध्ये वर्षभर झालेल्या विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यांचा वार्षिक पारितोषिक वितरण जेष्ठ साहित्यिक मा.रामदास फुटाणे, संस्थेचे अध्यक्ष मा. शामराव पाटील (काका) व नियामक मंडळाचे सदस्य प्रा.शामराव पाटील (आणा),यांच्या शुभहस्ते व महाविद्यालयाच्या संचालक डॉ.सौ.एस.एस.कुलकर्णी यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला. यावेळी एन.एस्.एस्. शिबीर कालावधीमध्ये उत्तम कार्य केलेबद्दल (उत्कृष्ठ स्वयंसेवक) कु.उत्कर्ष पाटील या विद्यार्थ्याचा मा.प्रमुख पाहुणे यांचे हस्ते गौरव करण्यात आला.

# चर्चासत्र आयोजन




दि. ०५ एप्रिल २०१६ रोजी रा.से.योजनेच्या वतीने आयोजित चर्चासत्रावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.हमीद दाभोळकर



दि. ०५ एप्रिल २०१६ रोजी रा.से.योजनेच्या वतीने आयोजित चर्चासत्रावेळी डॉ.हमीद दाभोळकर यांना अंधश्रध्देविषयी आपल्या शंका विचारताना विद्यार्थी

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



दि. १४ एप्रिल २०१६ भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना प्राचार्य विश्वास सायनाकर सर, डॉ.एस.एम.सावंत, प्रा.संदीप पाटील




दि. १४ एप्रिल २०१६ भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य विश्वास सायनाकर सर



दिनांक २१ जून २०१६ दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ॐ कार प्रतिमेचे पुजन करताना डॉ.पी.एस.पाटील, डॉ.एस.एम. सावंत,योगशिक्षक श्री.शशिकांत माने व एन.एस.एस.कार्यक्रम अधिकारी श्री.संदीप पाटील



२१ जून २०१६ दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगशिक्षक श्री.शशिकांत माने यांचा सत्कार करताना डॉ.पी.एस.पाटील, डॉ.एस. एम.सावंत व एन.एस.एस.कार्यक्रम अधिकारी श्री.संदीप पाटील



दिनांक २१ जून २०१६ दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आर.आय.टी. मध्ये योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करताना उपस्थित उपस्थित शिक्षक व विद्यार्थी




दिनांक २१ जून २०१६ दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आर.आय.टी. मध्ये योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करताना उपस्थित शिक्षक व विद्यार्थी



दि. १ जुलै २०१६ महाराष्ट्र शासनाने ''हरित महाराष्ट्राची'' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महाविद्यालयामध्ये या दिवशी २०० वृक्ष लागवड करण्यात आली.या प्रसंगी वृक्षारोपन करताना डॉ.डॉ.सौ.एस.एस.कुलकर्णी, संचालक, डॉ. एम.टी.तेलसंग, प्रा.पी.एम.मोहिते, प्रा.संदीप पाटील, कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो व इतर



दि. १ जुलै २०१६ महाराष्ट्र शासनाने ''हरित महाराष्ट्राची'' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महाविद्यालयामध्ये या दिवशी २०० वृक्ष लागवड करण्यात आली. या प्रसंगी वृक्षारोपन करताना डॉ.राजेंद्र कुरळुपकर, सहसचिव, कासेगांव शिक्षण संस्था, प्रा.पी.एम.मोहिते व प्रा.संदीप पाटील, कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो.



दि. १ जुलै २०१६ महाराष्ट्र शासनाने ''हरित महाराष्ट्राची'' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महाविद्यालयामध्ये या दिवशी २०० वृक्ष लागवड करण्यात आली. या प्रसंगी वृक्षारोपन करताना रा.से.यो. चे स्वयंसेवक




दि. १ जुलै २०१६ महाराष्ट्र शासनाने ''हरित महाराष्ट्राची'' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महाविद्यालयामध्ये या दिवशी २०० वृक्ष लागवड करण्यात आली. या प्रसंगी वृक्षारोपन करताना रा.से.यो. चे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी




२६ जुलै २०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना उद्‌घाटन व सदस्य नोंदणी समारंभाचे वेळी स्वयंसेवकांना ''राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी'' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.सुरज चौगुले




२६ जुलै २०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना उद्‌घाटन व सदस्य नोंदणी समारंभाचे वेळी स्वयंसेवकांना एन.एस.एस. दैनंदिनी प्रदान करताना प्रमुख पाहुणे




जुलै २०१६ क्रांती स्मृती वन, बलवडी येथे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केलेली त्यावेळी बलवडी येथे वृक्षदिंडी चे आयोजन



जुलै २०१६ क्रांती स्मृती वन, बलवडी येथे राष्ट्रीय सेवा योजना चे वतीने वृक्षारोपन केले

# लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी
# लोकशाहीर आण्णा भाऊ साठे व लोकनेते राजारामबापू पाटील यांची जयंती



१ ऑगस्ट २०१६ रोजी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी तसेच आण्णा भाऊ साठे व महाविद्यालयाचे संस्थापक लोकनेते राजारामबापू पाटील यांची जयंती प्रसंगी प्रतिमेचे पुजन करताना संचालक डॉ.सौ.एस.एस.कुलकर्णी




दि. १ ऑगस्ट २०१६ लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले त्यावेळी रक्तदान करताना

# १५ ऑगस्ट २०१६



दिनांक १५ ऑगस्ट या दिवशी महाविद्यालयामध्ये ध्वजारोहण करताना डॉ.एस.एम.सावंत



दिनांक १५ ऑगस्ट या दिवशी महाविद्यालयामध्ये ध्वजारोहण समारंभ

# १५ ऑगस्ट २०१६



दिनांक १५ ऑगस्ट या दिवशी महाविद्यालयामध्ये पथनाटय सादर करताना विद्यार्थी



दिनांक १५ ऑगस्ट या दिवशी महाविद्यालयामध्ये पथनाटय सादर करताना विद्यार्थी

# श्रमदान – साखराळे



दि.२४ सप्टेंबर, २०१६ रोजी राष्ट्रीय सेव योजना दिनानिमित्त मु.पो.साखराळे येथे ग्रामपंचायत परिसरामध्ये स्वच्छता व श्रमदान करताना रा.से.यो. चे स्वयंसेवक



दि.२४ सप्टेंबर, २०१६ रोजी राष्ट्रीय सेव योजना दिनानिमित्त मु.पो.साखराळे येथे जि.प.शाळा परिसरामध्ये स्वच्छता व श्रमदान करताना रा.से.यो. चे स्वयंसेवक

# ऑक्टोबर २०१६

## गांधी जयंती – स्वच्छ भारत अभियान




दिनांक २ ऑक्टोबर २०१६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती निमित्त उरूण–इस्लामपूर नगरपरिषद व राष्ट्रीय सेवा योजना यांचे वतीने इस्लामपूर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



दिनांक २ ऑक्टोबर २०१६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती निमित्त 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत इस्लामपूर परिसरामध्ये स्वच्छता व श्रमदान करताना सर्व विद्यार्थी

# रक्तदान शिबीर




दि. ०४ ऑक्टोबर २०१६ रोजी महाविद्यालयामध्ये आयोजित रा.से.योजनेच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबीराचे वेळी रक्तदान करताना विद्यार्थी.



दि. ०४ ऑक्टोबर १६ रोजी महाविद्यालयामध्ये आयोजित रा.से.योजनेच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरामध्ये रक्तदान केलेल्या विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देताना मान्यवर.




ऑक्टोबर २०१६ इस्लामपूर येथे राष्ट्रीय एकात्मता व निर्भया सायकल रॅलीचे आयोजन केले होते.




इस्लामपूर येथे राष्ट्रीय एकात्मता व निर्भया सायकल रॅलीचे स्वागत करताना डॉ.एस.एम.सावंत, प्रा.संदीप पाटील, कार्यक्रम अधिकारी व इतर

# नोहेंबर २०१६
# संविधान दिन साजरा




दिनांक २६ नोहेंबर २०१६ रोजी संविधान दिनानिमित्त ''संविधानाचे वाचन''



दिनांक २६ नोहेंबर २०१६ रोजी संविधान दिनानिमित्त ''संविधानाचे वाचन'' करताना रा.से.योजनेची स्वयंसेविका कु. मनाली जाधव व उपस्थित शिक्षक व विद्यार्थी




जि.प.साखराळे येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना प्रा.एस.एम.सावंत, प्रा.शरद कुंभार व इतर



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त जि.प.साखराळे येथिल विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले

# स्वामी विवेकानंद यांची जयंती – राष्ट्रीय युवा दिन



स्वामी विवेकानंद यांची जयंती म्हणजेच 'राष्ट्रीय युवा दिन' निमित्त चर्चासत्रामध्ये सहभागी विद्यार्थी




'राष्ट्रीय युवा दिन' निमित्त आयोजित चर्चासत्र

## सागरेश्वर येथिल कार्यशाळेतील क्षण – फेब्रुवारी २०१७




दिनांक २५ व २६ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.नितीन शिंदे




दिनांक २५ व २६ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत दरम्यान सागरेश्वर अभयारण्य कार्यक्षेत्राचे वनअधिकारी साळीसाहेब यांनी भेट दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# सागरेश्वर अभयारण्य येथे भ्रमंती – फेब्रुवारी २०१७



दिनांक २५ व २६ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत दरम्यान सागरेश्वर अभयारण्यामध्ये पदभ्रमंती करताना रा.से.यो.चे विद्यार्थी



दिनांक २५ व २६ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत दरम्यान सागरेश्वर अभयारण्यामध्ये पदभ्रमंती दरम्यान किर्लोस्कर पॉईंट येथे विश्रांती दरम्यान क्षण

# विशेष श्रमसंस्कार शिबीर २०१६–१७




## १. उद्घाटन समारंभ सोमवार दिनांक ०२/०१/२०१७

- उद्घाटक : मा.विजयबापू पाटील, उपाध्यक्ष राजारामबापू सह. साखर कारखाना
- अध्यक्ष : डॉ.एस्.एम्.सावंत
  डीन,स्टुडंट डेव्हलपमेंट आर.आय.टी.
- प्रमुख उपस्थिती : सौ.सुजाता जयकर बाबर,
  सरपंच, ग्रामपंचायत साखराळे
- स्थळ : ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे
  ता.वाळवा, जि.सांगली
- वेळ : सकाळी १०.०० वाजता
- लाभार्थी : १००




शिबीराचे उद्घाटन समारंभ प्रसंगी दीप प्रज्वलन करताना करताना प्रमुख पाहुणे मा.विजयबापू पाटील, उपाध्यक्ष राजारामबापू सह. साखर कारखाना व इतर मान्यवर





शिबीराचे पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना योग शिक्षक मा.शशिकांत माने सर



ग्रामस्वछता मोहिमेअंतर्गत श्रमदान करताना रा.से.योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी ठिकाण –
जिल्हा परिषद शाळा परिसर, साखराळे



ग्रामस्वछता मोहिमेअंतर्गत श्रमदान करताना रा.से.योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी ठिकाण –
जिल्हा परिषद शाळा परिसर, साखराळे



साखराळे ग्रामपंचायत परिसर स्वच्छता करताना स्वयंसेवक



साखराळे येथिल जि.प.शाळा परिसरामध्ये स्वच्छता करताना स्वयंसेवक



साखराळे येथिल विद्यार्थ्यांना विविध कला व खेळ शिकविताना रा.से.यो.चे स्वयंसेवक



साखराळे येथिल जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये विविध स्पर्धा आयोजित केलेल्या त्या स्पर्धामध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिस प्रदान करताना शाळेच्या शिक्षीका, कार्यक्रम अधिकारी व एन.एस.एस.चे स्वयंसेवक




साखराळे येथे 'कॅशलेस अर्थव्यवस्था' या विषयावर लघुनाटिका सादरीकरण करताना एन.एस.एस.चे स्वयंसेवक



'कॅशलेस अर्थव्यवस्था' या विषयावर लघुनाटिका सादरीकरण करताना एन.एस.एस.चे स्वयंसेवक



साखराळे येथे शिबीरादरम्यान शेकोटी वेळी एन.एस.एस.चे स्वयंसेवक



शिबीर कालावधीमध्ये शेकोटी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे वेळी त्याचा आनंद घेताना एन.एस.एस.चे स्वयंसेवक




पंचायत समितीचे सभापती मा. रविंद्र बर्डे यांचा सत्कार करताना मा.विजयबापू पाटील, उपाध्यक्ष राजारामबापू सह. साखर कारखाना, डॉ.एस.एम.सावंत व इतर




शिबीराच्या सांगता समारंभाचे प्रसंगी बोलताना उपसरपंच मा.विजयबापू पाटील, उपाध्यक्ष राजारामबापू सह. साखर कारखाना




शिबीरामध्ये उत्कृष्ठ स्वयंसेवक म्हणून काम केलेला विद्यार्थी कु.उत्कर्ष जाधव याचा सत्कार करताना प्रमुख पाहुणे




शिबीराच्या सांगता समारंभाचे प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे मा. रविंद्र बर्डे, सभापती, वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर बाजूस मा.विजयबापू पाटील, उपाध्यक्ष राजारामबापू सह. साखर कारखाना, मा.राजेंद्र पाटील, डॉ.एस.एम सावंत व इतर

१. व्याख्यान : सोमवार दिनांक ०२/०१/२०१७

- वक्ते : मा.शशिकांत माने
- विषय : योग आणि आहार
- ठिकाण : ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे
- लाभार्थी : ६०




शिबीरादरम्यान 'योग आणि आहार' या विषयावरील व्याख्यानामध्ये
मार्गदर्शन करताना मा.शशिकांत माने

२. व्याख्यान : मंगळवार दिनांक ०३/०१/२०१७

- वक्ते : मा.धनंजय चव्हाण
- विषय : 'डिजीटल अर्थव्यवस्था'
- ठिकाण : ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे
- लाभार्थी : १५०




शिबीरादरम्यान 'डिजीटल अर्थव्यवस्था'या विषयावर मार्गर्शन करताना मा.धनंजय चव्हाण




शिबीरादरम्यान 'डिजीटल अर्थव्यवस्था'या विषयावर मार्गर्शन करताना मा.धनंजय चव्हाण

## ३.व्याख्यान : बुधवार दिनांक ०४/०१/२०१७

- वक्ते : मा.कालिदास पाटील
- विषय : 'ताण–तणाव आणि व्यसनाधिनता'
- ठिकाण : ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे
- लाभार्थी : ७५



शिबीर कालावधीमध्ये मा.कालिदास पाटील यांचे स्वागत करताना मा.विजयबापू पाटील




शिबीर कालावधीमध्ये 'ताण–तणाव आणि व्यसनाधिनता' या विषयावर मार्गदर्शन करताना मा.कालिदास पाटील

## ४. व्याख्यान : गुरूवार दिनांक ०५/०१/२०१७

- वक्ते : मा.शंकर कुलकर्णी व निवास कळसे
- विषय : ‘प्राणी मित्र’
- ठिकाण : ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे
- लाभार्थी : १३०



शिबीरादरम्यान व्याख्यानामध्ये मार्गदर्शन करताना प्राणीमित्र मा.शंकर कुलकर्णी



शिबीरादरम्यान मा.शंकर कुलकर्णी यांच्या व्याख्याना चे वेळी उपस्थित रसिक

५.   व्याख्यान : शुक्रवार दिनांक ०६/०१/२०१७

- वक्ते : प्रा.विष्णू होनमोरे
- विषय : ‘अंधश्रध्दा आणि बुवाबाजी’
- ठिकाण : ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे
- लाभार्थी : १५०




शिबीराचे वेळी मार्गदर्शन करताना प्रा.विष्णू होनमोरे



शिबीराचे वेळी अंधश्रध्दा विषयी काही चित्रफिती सादर करताना प्रा.विष्णू होनमोरे

६.  समारेप : रविवार  दिनांक ०८/०१/२०१७

- वक्ते : मा.रविंद्र बर्डे व मान्यवर
- विषय : ‘आढावा ’
- ठिकाण : ग्रामपंचायत कार्यालय, साखराळे
- लाभार्थी : १५०



शिबीरातील आपले अनुभव कथन करताना रा.से.यो. स्वयंसेवक



शिबीरामधील सहभागी विद्यार्थी प्रमुख मान्यवरांसमवेत

# विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

कासेगांव शिक्षण संस्थेचे, राजारामबापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर साखराळे ता.वाळवा येथे दि. ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी २०१७ या कालावधीत संपन्न झाले. शिबीरात घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती खालील प्रमाणे आहे.

**१) श्रमदान व परिसर स्पच्छता –**

शिबीरातील स्वयंसेवकांनी प्राथमिक शाळा परिसर, ग्रामपंचायत परिसर, आंबेडकर नगर, राजेबागेश्वर रस्ता दुर्फा असणाऱ्या झाडांना आळी करणे व स्वच्छता, गावातील प्रमुख रस्ते, चौक, इत्यादी ठिकाणी जावून परिसर स्वच्छता व श्रमदान करण्यात आले.

**२) जिल्हा परिषद शाळा मध्ये विविध स्पर्धा –**

जि.प. शाळा साखराळे मधील सर्व विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा या हेतूने शिबीर कालावधीमध्ये त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या मध्ये स्पर्धा आयोजित केल्या यामध्ये चित्रकला, रांगोळी, वक्तृत्व इ. स्पर्धांचा समावेश होता. त्यामध्ये क्रमांक आलेल्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शालेय साहित्य बक्षिस दिले.

**३) वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन –** जिल्हा परिषद शाळा क्र. १ व २ या परिसरामध्ये शिबीर कालावधीत पूर्वी रोपण केलेली साठ झाडांना पाणी घालणे, बाजूने आळे करणे इत्यादी प्रकारे संवर्धन केले तसेच शाळेच्या छतावर साचलेला कचरा साफ केला.

**४) शालाबाहय सर्वेक्षण –**

साखराळे गावातील शालाबाहय मुलांचा सर्व्हे केला व त्याची माहिती जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री.आडके सर यांचेकडे सुपुर्द केली.

**५) कुटुंब सर्वेक्षण –** साखराळे गावातील १०७२ कुटुंबांचा सर्व्हे केला त्यामध्ये कुटुंबातील सदस्य संख्या, बॅक खाते आहे/नाही याबद्दल माहिती, शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज केला आहे/नाही या विषयी, आधार कार्ड, रेशन कार्ड इ. विषयी माहिती घेऊन ती माहिती मा.सरपंच यांचेकडे सुपुर्द केली.

**७) रांगोळी स्पर्धांचे आयोजन :–** शालेय विद्यार्थ्यांमध्ये कला गुण विकसित होणेकरिता त्यांच्यामध्ये रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या व विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवकांनी रांगोळी चे साहित्य बक्षिस म्हणून दिल्या.

**७) वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन :—** शालेय विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व गुण विकसित होणेकरिता त्यांच्या स्पर्धा आयोजित केल्या त्यासाठी सर्व वर्गामध्ये स्वयंसेवकांनी वक्तृत्व सुधारण्याविषयी मार्गदर्शन केले. स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवकांनी शालेय उपयोगी वस्तू बक्षिस म्हणून दिल्या.

**८) लघुनाटिका व पथनाटय सादरीकरण —**

शिबीरार्थींनी साखराळे गावातील नागरिकांना शासनाने सुरू केलेल्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी तसेच त्या योजनांची माहिती होण्यासाठी लघुनाटिका च्या माध्यमातून प्रबोधन केले तसेच कॅशलेस व्यवहार त्याचे फायदे व त्याविषयी जनजागृती करण्याकरिता गावातील प्रमुख ठिकाणी पथनाटयाचे आयोजन करण्यात आले.

**०९) प्रबोधनपर व्याख्याने —**

शिबीरातील स्वयंसेवकांचे व स्थानिक ग्रामस्थांचे बौध्दिक प्रबोधन व्हावे म्हणून तज्ञ व्यक्तींची विविध विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली. यामध्ये सई मंद्रुपकर यांचे 'स्त्री आरोग्य' या विषयावर डॉ.राहुल मोरे यांचे 'व्यसनमुक्ती' या विषयावर, डॉ.एस.जी. साळवी यांचे 'महात्मा गांधी' या विषयावर, मा.डी.डी.थोरात यांनी 'हागणदारीमुक्त गाव' या विषयावर, प्रा.विष्णू होनमोरे यांचे 'अंधश्रध्दा' या विषयावर इत्यादी तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली. या सर्व व्याख्यान प्रसंगी शिबीरामधील स्वयंसेवक तसेच गावामधील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

Programme Co-Ordinator
National Service Scheme (N.S.S.)
Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar.

# इस्लामपुरात योग दिन साजरा

**इस्लामपूर : शहर वार्ताहर**

इस्लामपूर शहर व परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. शहरातील विविध संस्था, शाळा, कॉलेज, महाविद्यालयांमध्ये सकाळी योगाची प्रात्यक्षिके करून योग दिन साजरा केला.

येथील आर. आय. टी. मध्ये योग दिन साजरा केला. योग विद्याधामचे योग प्रशिक्षक शशिकांत माने यांचे मार्गदर्शन लाभले. माने यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व सांगून योगासनांची प्रात्यक्षिके केली. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संदीप पाटील यांनी स्वागत केले. डॉ. पी. एस. पाटील यांनी योगशिक्षक माने यांचा सत्कार केला. डॉ. एस. एम. सावंत, प्रा. डी. जी. ठोंबरे, डॉ. बोहरा, डॉ. पी. डी. कुंभार, प्रा. पी. एम. जाधव, सौ. एस. पी. पाटील उपस्थित होते. शहरातील इस्लामपूर हायस्कूल, डॉ. नेर्लेकर प्राथमिक विद्यालय, आदर्श बालक मंदिर, विद्यामंदिर, वाय. सी. कॉलेज, कासेगाव शिक्षण संस्थेच्या सर्व शाळा, कॉलेज, महाविद्यालयांमध्ये योग दिन साजरा करण्यात आला.



**इस्लामपूर : येथील आर. आय. टी. मध्ये योगाचे प्रात्यक्षिक करताना प्राध्यापक.**

सकाळ
सांगली, बुधवार,
२२ जून २०१६
II

## आरआयटीमध्ये योग दिन उत्साहात

इस्लामपूर, ता. २१ : येथील राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात झाला. योग विद्याधामचे प्रशिक्षक शशिकांत माने यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. ते म्हणाले, ''दैनंदिन जीवनात योगाच्या सहाय्याने ताणतणावातून मुक्त होता येते. योगसाधना दैनंदिन जीवनाचा घटक बनण्याची आवश्यकता आहे.''

प्रा. संदीप पाटील यांनी स्वागत व प्रा. शरद कुंभार यांनी आभार मानले. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते शशिकांत माने यांचा सत्कार झाला. डॉ. एस. एम. सावंत, प्रा. डी. जी. ठोंबरे, डॉ. बोहरा, डॉ. पी. डी. कुंभार, प्रा. पी. एम. जाधव, एस. पी. पाटील उपस्थित होते.

# क्रांती स्मृतिवनात उपेक्षितांच्या नावे वृक्षारोपण

## इस्लामपूरच्या आरआयटी व विवेक वाहिनीचा पुढाकार

**सकाळ वृत्तसेवा**

आळसंद, ता. २ : 'देश बचाओ, देश बनाओ', चला, विवेकाचा आवाज बुलंद करूया, पर्यावरण संरक्षणासाठी झाडे लावूया', अशा घोषणा देत बलवडी भा. (ता. खानापूर) येथील क्रांती स्मृतिवनात इस्लामपूरच्या राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय व विवेक वाहिनी शाखा इस्लामपूर यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे एकदिवसीय श्रम संस्कार शिबिर संपन्न झाले. सकाळी शिबिरार्थींनी फेरी काढली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष प्रा. संजय बनसोडे, संदीप पाटील, एस. एम. सावंत, अनिल पाटील, संपतराव पवार प्रमुख उपस्थित होते.

श्री. बनसोडे म्हणाले, ''स्मृतिवनात क्रांतिकारकांच्या नावाने लावलेली झाडे वृक्षरूपी स्मारके आहेत. विवेक वाहिनीने राबवलेला उपक्रम कौतुकास्पद आहे.''

प्रा. पाटील म्हणाले, ''क्रांती स्मृतिवनाची प्रेरणा घेऊन महाविद्यालय परिसरात प्रतिक्रांतिवन उभारण्यासाठी व्यवस्थापनाशी चर्चा करून निर्णय घेऊ.''

श्री. पवार म्हणाले, ''तरुणांविषयी उलट-सुलट चर्चा असते. त्यांच्यात सकारात्मकतेची ऊर्जा असते.''

सुयश तोष्णीवाल, श्वेता नागणे, रितेश अबलिंगे, उत्कर्ष जाधव यांनी मनोगते व्यक्त केली. किरण माने, विशाल पाटील यांनी सापांविषयी माहिती दिली. पर्यावरणाचे महत्त्व सांगणारे पथनाट्य सादर करण्यात आले. बी. डी. कुंभार, आर. एन. कास्कर, वाघेश साळुंखे, संजय निकम, बाबूराव पवार, जगन्नाथ पवार, तुळशीदास पवार यांनी संयोजन केले.



**बलवडी भा. : येथील क्रांती स्मृतिवनात बळिराजा धरण व क्रांतिस्मृतीच्या निर्मितीत योगदान देणाऱ्यांच्या नावाने वृक्षारोपण करताना शिबिरार्थी.**

### यांच्या नावाने झाले स्मृतिवनात वृक्षारोपण

**बलवडीतील बळिराजा धरण, क्रांती स्मृतिवन निर्मिती व जनचळवळीत योगदान देणाऱ्यांच्या नावाने स्मृतिवनाच्या प्रवेशद्वाराजवळ वृक्षारोपण करण्यात आले. माजी सरपंच सुबराव पवार, बी. आर. पवार, आर. एन. मोहिते, मारुती जाधव, शामराव थोरात, विष्णू सावंत, शामराव पवार, बंडू पवार, गणपती जाधव यांच्यासह २६ जणांच्या नावे वृक्षारोपण केले.**



बलवडी (ता. खानापूर) येथील क्रांती स्मृती वनात आरआयटीच्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. यावेळी संपतराव पवार, प्रा. संदीप पाटील उपस्थित होते.


# 'आरआयटी'च्या विद्यार्थ्यांचे क्रांती स्मृती वनात श्रमदान

**इस्लामपूर :** येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजना व विवेक वाहिनीच्यावतीने बलवडी (ता. खानापूर) येथील क्रांती स्मृती वनामध्ये श्रमदान व वृक्षारोपण करण्यात आले.

महाविद्यालयातील ९० विद्यार्थ्यांनी बलवडी गावात वृक्षदिंडी काढली. 'समर्थ युवक, समर्थ भारत', 'विवेकाचा आवाज बुलंद करुया' अशा घोषणा दिंडी निघाली. संपतराव पवार यांनी या दिंडीचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी क्रांती स्मृती वनाचे महत्त्व जाणून तेथे श्रमदान केले. सर्पमित्र विशाल पाटील, विकास माने, विवेक यांनी सापांच्या जाती, परिसरात आढळणारे साप व सर्पदंशानंतर प्रथमोपचाराची माहिती दिली.

अंनिसचे कार्याध्यक्ष संजय बनसोडे, प्रा. डी. आर. जाधव यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी अनिल पाटील, उत्कर्ष जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. एस. एम. सावंत, प्रा. अनिल पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील, प्रा. विष्णू होनमोरे, बी. डी. कुंभार, आर. एन. कास्कर, वाघेश साळुंखे, संजय निकम, डी. ए. सावंत, सुयश तोष्णीवाल, श्वेता नागणे उपस्थित होते. (वार्ताहर)

दै. लोकमत 22/10/2016



इस्लामपूर येथे शुक्रवारी आरआयटीमध्ये विद्यार्थ्यांना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. शामराव पाटील, डॉ. एस. एस. सावंत, संजय बनसोडे उपस्थित होते.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आदर व्हावा

## श्रीपाल सबनीस : इस्लामपूर येथे व्याख्यान

**इस्लामपूर** : बहुसांस्कृतिक वातावरणात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आदर केला पाहिजे. संगीत, कला यांना देशाच्या सीमेत बंदिस्त करता येणार नाही. भारताच्या अहिंसक परंपरेचे पाईक बनून तरुणाईने विवेकी मूल्य विचार जपावा, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

येथील राजारामनगरमधील आर. आय. टी.च्या एन. एस. एस. व विवेक वाहिनीच्यावतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्रा. शामराव पाटील अध्यक्षस्थानी होते.

सबनीस म्हणाले, सद्यस्थितीत राष्ट्रहिताला प्राधान्य देत, विषमता नष्ट करण्याचा सामुदायिक प्रयत्न झाला पाहिजे. देशाचा इतिहास विवेकाने मांडायला हवा. समतेच्या मूल्यावर ठाम विश्वास ठेवून सनातनी प्रवृत्तीला प्रखर विरोध हवा.

यावेळी कवी प्रा. प्रदीप पाटील, प्रा. एकनाथ पाटील, अं.नि.स. राज्य सरचिटणीस संजय बनसोडे, प्रा. एस. एम. सावंत, प्रा. संदीप पाटील, प्रा. विजय गायकवाड, विजय नांगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

रितेश आदलिंगे याने स्वागत व प्रास्ताविक केले. उत्कर्ष जाधव याने आभार मानले. श्वेता नागणे, योगेश्वरी पाटील, शुभम आलमावर, मृणाली हाके, प्रणिता खटावकर, अभिजित वंदनगर, सोहा कुलकर्णी, वरद ताटे आदींनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. (वार्ताहर)

दै. सकाळ 2 सप्टेंबर 2016

# आरआयटीत 'अंनिस'तर्फे कार्यशाळा

इस्लामपूर, ता. १ : वैज्ञानिक दृष्टिकोनाने समाजाची प्रगती होईल. तरुणाईने वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करून याचा प्रचार व प्रसार करण्याची गरज आहे, असे मत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रधान सचिव प्रशांत पोतदार यांनी व्यक्त केले.



**इस्लामपूर : आरआयटी मध्ये अंनिसतर्फे आयोजित कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.**

येथील राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र विवेक वाहिनीतर्फे आयोजित चमत्कार सादरीकरण कार्यशाळेत ते बोलत होते. रितेश आदलिंगे यांनी स्वागत केले. राज्य सरचिटणीस संजय बनसोडे यांनी कार्यशाळेचे उद्‌घाटन केले.

पाण्याचा दिवा पेटवणे, आग खाणे, त्रिशूळ जिभेतून काढणे, मंत्राने अग्नी पेटविणे, लंगर तोडणे आदी चमत्काराचे प्रयोग विद्यार्थ्यांना शिकवले. प्रा. संदीप पाटील, प्रा. सुषमा देसाई, प्रा. डॉ. नितीन शिंदे, प्रा. विष्णू होनमोरे उपस्थित होते. विजय नांगरे, जगन्नाथ नांगरे, संजय रोकडे, सुनील जाधव, अजय भालकर यांनी प्रबोधनाची गीते सादर केली.

मनाली जाधव, शुभम आलमवार, योगेश्वरी पाटील, अभिजित चंदनकर, गणेश घाडगे, प्रथमेश ढाणे, उत्कर्ष पाटील, समीर चौगुले, सुदर्शन जगताप, वरदराज ताटे यांनी संयोजन केले. श्वेता नागणे यांनी आभार मानले.